## निशाणी क्र.१ खालील आदेश

(अधिघोषीत दिनांक १३/१०/२०२३)

अर्जदार यांनी त्यांच्या नावे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. बापुराव तुकाराम उमरे यांचा दि.०७/१२/२०२१ रोजी मृत्यू झालेला आहे. अर्जदार अनिता बापुराव उमरे ह्या मयताची पत्नी असुन, गैरअर्जदार क्र.१ राकेश बापुराव उमरे व गैरअर्जदार क्र.२ महेंद्र बापुराव उमरे ही मयताची मुले आहेत.

३. अर्जदार यांनी अर्जातील कथनांच्या सत्यतेसाठी अर्जदार अनिता बापुराव उमरे यांचे पुराव्याचे शपथपत्र (नि.क्र.१९), त्यांचे पती मयत नामे बापुराव तुकाराम उमरे यांचे मृत्यु प्रमाणपत्राची तडताळणी केलेली प्रत (नि.क्र.२०), अर्जदार यांचे आधार कार्डची साक्षांकीत प्रत (नि.क्र.२१), मौजा राजुरा येथील सर्वे क्र.१४५/१, प्लॉट क्र.१०७ चे ७/१२ उता–याची प्रत (नि.क्र.२२), चारचाकी वाहन नोंदणी क्र. एम.एच.३४/ बी.एफ.४०८५ चे आर.सी. बुकची पडताळणी केलेली प्रत (नि.क्र.२३), जाहिर नोटीसची मुळ प्रत व बील (नि.क्र.२४ व २५) इत्यादी कागदपत्रे व अर्जदारातर्फे पुरावा बंद पुरसीस (नि.क्र.२६) दाखल केलेली आहे. अर्जदार यांनी त्यांचे शपथपत्रात अर्जातील कथनांचा पुनरउल्लेख करुन अर्जदार यांच्या नावे कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्याची मागणी केली

असून, अर्ज मंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

४. अर्जदार यांनी अर्जाच्या अनुषंगाने न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र 'पुण्य नगरी' या दिनांक १६/०५/२०२३ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले.

५. गैरअर्जदारातर्फे लेखी उत्तर (नि.क्र.१४) आणि गैरअर्जदार क्र.१ व २ यांचे आधार कार्डची पडताळणी केलेल्या प्रती सुची नि.क्र.२९ प्रमाणे दाखल केलेल्या आहे. गैरअर्जदारांनी त्यांच्या लेखी उत्तर दाखल करून सर्वे क्र.१४५/१, प्लॉट क्र.१०७ व चारचाकी वाहन नोंदणी क्र. एम.एच.३४/बी.एफ.४०८५ च्या अनुशंगाने अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास त्यांची हरकत नसल्याबाबत नमुद केलेले आहे. तसेच गैरअर्जदारातर्फे पुरसीस (नि.क्र.२७) प्रमाणे पुरावा बंद करण्यात आला.

६. वरील कागदपत्रांच्या अनुषंगाने माझे असे मत आहे की, अर्जदार यांनी शपथेवर त्यांचे व गैरअर्जदारांव्यतिरिक्त मयताला इतर कोणीही वारस नसल्याचे कथन केले आहे. तसेच गैरअर्जदारांनी देखील वर नमुद सर्वे क्रमांक व वाहनाच्या अनुशंगाने अर्जदार यांना वारसा प्रमाणपत्र देण्यास हरकत घेतली नाही. तरीदेखील, अर्जदार व गैरअर्जदार यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरून अर्जदार व गैरअर्जदार हे मयताचे वारस असल्याचे स्पष्टपणे दिसुन येत असुन, कायद्यानुसार अर्जदार व गैरअर्जदार हे मयताचे वर्ग–१ चे वारस

असल्यामुळे अर्जदार व गैरअर्जदार यांच्या नावे वारस प्रमाणपत्र देणे उचीत ठरेल.

७. वरील सर्व बाबींचा एकंदरीत विचार करता, कायद्याची वारस प्रमाणपत्रासंदर्भातील स्थायी स्थिती लक्षात घेता सदर प्रमाणपत्र अर्जदार व गैरअर्जदार हे मयताचे वारस असल्याचे याव्दारे प्रमाणीत करण्यात येते. परंतु, सदर प्रमाणपत्रान्वये वारसांचे कोणतेही हक्क अथवा अधिकार याव्दारे अर्जदारांना देण्यात येत नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार अनिता बापुराव उमरे व गैरअर्जदार क्र.१ राकेश बापुराव उमरे आणि गैरअर्जदार क्र.२ महेंद्र बापुराव उमरे हे मयत बापुराव तुकाराम उमरे यांचे मृत्यु पश्चात त्याचे वारस असल्याबाबत न्यायालयाकडुन मान्यता देण्यात येते. त्यांची नावे विहित नमुन्यातील वारसा प्रमाणपत्र, त्यांनी आवश्यक ते न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर देण्यात यावे.

३. अर्जदारांनी सुरक्षिततेसाठी आजच्या तारखेचे मुल्यांकनाच्या रकमेचे बंधपत्र जातमुचलक्यासह वरील रक्कम न्यायालय आदेश करील तेव्हा न्यायालयात जमा करण्याकरीता निष्पादित करावे.

NIKHIL LAXMAN HEMNE
Digitally signed by NIKHIL LAXMAN HEMNE
Date: 2023.10.13 16:51:31 +0530

**(निखील ल. हेमणे)**

स्थळ – राजुरा
सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)

दिनांक – १३/१०/२०२३
राजुरा, जि. चंद्रपूर